Pune Police

**निलेश वाडकर खून प्रकरणातील कुविख्यात गुन्हेगार सुनिल ऊर्फ चॉकलेट सुन्या किशोर डोकेफोडे यास पुणे शहर गुन्हे शाखेने अटक केले बाबत..**

---

दि. १३/०१/२०१९ रोजी सायं.०६.०० वा चे सुमारास दत्तवाडी पो स्टे हददीत जनता वसाहत मध्ये त्या भागातील पोलीस स्टेशन अभिलेखावरील निलेश वाडकर हा आपले साथीदार अमोल कदम, गणेश जाधव ऋषिकेश चव्हाण, सुजित बडंवे यांचेसोबत जयभवानीनगर कडून कांदेआळीकडे जात असताना पुर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन व सुनिल डोकेफोडे याच्या हप्ते वसुलीस निलेश वाडकर विरोध करतो म्हणून सुनिल वाडकर व त्याच्या त्याचे सोबत असणा-या १५ साथींदारांनी पुर्व नियोजित कट करुन कोयत्याने वार करुन लोंखडी पिस्टलमधून फायर करुन निलेश वाडकर यास जिवे ठार मारले. तसेच अमोल कदम, गणेश जाधव ऋषिकेश चव्हाण, सुजित बडंवे यांचेवरसुध्दा हल्ला करुन त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता. म्हणून दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे भादवि क ७५/१९ भादविक १४३,१४७,१४८,१४९,३०२,३०७,३२४,२०१, १२०(ब),भारतीय हत्यार कायदा ३/२५,४/२५,म.पो.अधिनियम कलम १४२, क्रिमीनल अमेंडमेंट ॲक्ट कलम ७, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३(१)(i)(ii), ३(२),३(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्हयातील प्रमुख सुत्रधार व मुख्य आरोपी सुनिल ऊर्फ चॉकलेट सुन्या किशोर डोकेफोडे, वय ३२ वर्षे रा. कांदेआळी, आंनद मठाजवळ, जनता वसाहत, पर्वती,पुणे हा गुन्हा घडलेपासून फरार होता.तो वांरवार पोलीसांना चकवा देवून निसटून जात होता. मा. डॉ. श्री. व्यंकटेशम् पोलीस आयुक्त व श्री रविंद्र शिसवे पोलीस सहआयुक्त,पुणे शहर यांचे आदेशान्वये अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे श्री अशोक मोराळे यांनी गुन्हे शाखेच्या सर्व शाखेला चॉकलेट सुन्या यास पकडण्याबाबतचे आदेश दिले होते. त्यावरुन पोलीस उप आयुक्त,गुन्हे,पुणे श्री शिरीष सरदेशपांडे यांचे मार्गदर्शनाखाली सपोआ,गुन्हे-१ समिर शेख, सपोआ,गुन्हे-२ भानुप्रताप बर्गे यांचे अधिपत्याखालील शाखा काम करीत होते.

गुन्हे शाखेस माहिती मिळाली की, चॉकलेट सुन्या हा गोवा येथे त्याचे साथीदार व पत्नी सोबत आहे व तो लवकरच गोव्यातील त्याची जागा सोडून अन्य स्थळी जाणार आहे. त्यावरुन युनिट १ व युनिट ०३ व युनिट ४ चे संयुक्त पथक त्यास पकडणेकामी गोवा येथे रवाना करण्यात आले होते. परंतू आरोपी सुनिल डोकेफोडे याने गुन्हे शाखेचे पथक पोहोचताच गोव्यातून स्थलांतर केले. त्याचा माग घेत असताना असे समजले की, तो एका खाजगी बस मधून मुंबईच्या दिशेने जात आहे. त्यावरुन सदर बसबाबत माहिती प्राप्त करुन त्यास कोल्हापूर येथे एका खाजगी लक्झरी बसने मुंबई येथे जात असताना मिळून आला. त्यास ताब्यात घेण्यात आले.

आरोपी सुनिल ऊर्फ चॉकलेट सुन्या किशोर डोकेफोडे हा पुणे पोलीस अभिलेखावरील कुविख्यात गुन्हेगार असून, त्याचेवर पुणे शहरात दत्तवाडी, भारती विदयापीठ, हवेली, वारजे पोलीस स्टेशन येथे एकुण २८ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई ही मा. डॉ. श्री. व्यंकटेशम् पोलीस आयुक्त व श्री. रविंद्र शिसवे, पोलीस सहआयुक्त, पुणे शहर यांचे आदेशान्वये, अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त श्री शिरीष सरदेशपांडे, सहा पोलीस आयुक्त श्री समिर शेख, सहा पोलीस आयुक्त श्री भानुप्रताप बर्गे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान व त्यांचे पथकातील पोलीस उप निरीक्षक विजय झंजाड, निलेशकुमार महाडिक, पोलीस कर्मचारी अशोक शेलार, गणेश साळुंखे, सचिन ढवळे,राकेश खुणवे, दत्ता फुलसुंदर, अतुल साठे, संदिप राठोड, संदिप तळेकर, सचिन जाधव, इम्रान शेख, यांनी केली आहे.

सुनिल ऊर्फ चॉकलेट सुन्या किशोर डोकेफोडे, वय ३२ वर्षे रा. कांदेआळी, आंनद मठाज
जनता वसाहत, पर्वती,पुणे याचेविरुध्द दाखल असणारे गुन्हे

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गुरनं व कलम |
|---|---|---|
| १ | दत्तवाडी | ७५/१९ भादवि क भादविक १४३,१४७,१४८,१४९,३०२,३०७,३२४,२०१, १२०(ब),भारतीय हत्यार कायदा ३/२५,४/२५,म.पो.अधिनियम कलम १४२, क्रिमीनल अमेंडमेंट ॲक्ट कलम ७, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३(१)(i)(ii), ३(२),३(४) |
| २ | दत्तवाडी | ३३२/१७ भादवि क ३०७,३२४,३२३,४५२,१४३,१४७,१४८,१४९,५०६ आर्म ॲक्ट क ३(२५) |
| ३ | दत्तवाडी | १४१/१४ भादवि क ३२६,३४ |
| ४ | हवेली | ५३/१२ भादवि क ३९२,३४ |
| ५ | दत्तवाडी | ३८/०९ भादवि क ३९२,३४ |
| ६ | दत्तवाडी | १३८/०९ भादवि क ३०७ |
| ७ | दत्तवाडी | ३९/०९ भादवि क ३९२,३४ |
| ९ | दत्तवाडी | ७३/०९ भादवि क ३९२,३४ |
| १० | दत्तवाडी | ७८/०९ भादवि क ४५४,४५७,३८० |
| ११ | दत्तवाडी | ९६/०९ भादवि क ४५४,४५७,३८० |
| १२ | दत्तवाडी | १७७/०९ भादवि क ४५४,४५७,३८० |
| १३ | दत्तवाडी | ११५/१३ भादवि क ३९२ |
| १४ | दत्तवाडी | ३०९९/१३ भादवि मुपो ३७(१) सह १३५ |
| १५ | दत्तवाडी | ३१६/१८ आर्म ॲक्ट क ३(२५) मुपो ३७(१) सह १३५ |
| १६ | हवेली | ६६१/१२ भादवि क ३९२,३४ |
| १७ | हवेली | ६७६/१२ भादवि क ३९२,३४ |
| १८ | हवेली | ३९/१३ भादवि क ३९९,४०२ |
| १९ | भारती विदयापीठ | २५०/१४ भादवि क ३२६,१४३,१४७,१४८,१४९ |
| २० | भारती विदयापीठ | ३५६/१४ भादवि क ३०७,३४२,३४ आर्म ॲक्ट क ३(२५) मुपो ३७(१) सह १३५ |
| २१ | हिंजवडी | १५/१६ भादवि ३०७,५०४,५०६,३४ |
| २२ | वारजे | ३१२६/१५ आर्म ॲक्ट ७(२५) मु पो का क ३७(१) सह १३५ |
| २३ | उत्तमनगर | ३०१५/१६ आर्म ॲक्ट ३,४,५(२५) मु पो का क ३७(१) सह १३५ |
| २४ | दत्तवाडी | ३८४/१४ भादवि क ३०७,३२३,५०४,३४ |
| २५ | दत्तवाडी | २९/११ भादवि क ३९२,३४ |
| २६ | दत्तवाडी | ३९/११ भादवि क ३९२,३४ |
| २७ | दत्तवाडी | ५०१/१८ भादवि क ३२४,३२३,५०४,३४ मु पो का क ३७(१) सह १३५ |
| २८ | दत्तवाडी | ४२८/१६ भादवि क ३०७,३२३,३३६,५०४,१४३,१४६,१४७,१४८,१४९ |


पुणे शहर पोलीस आयुक्तालय